# दरपत्रक

जा.क्र. राशैसंप्रपम /मूल्यमापन/ sqaaf/दरपत्रक /२०२४-२५/ ०५७४८/दि. ०३/१२/२०२४

प्रति,

-------------------------------

-------------------------------

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या कार्यालयातील SQAAF प्रशिक्षणासाठी आवश्यक असणारे VIDEO निर्मिती करण्यासाठी VIDEO तयार करणाऱ्या संस्थांकडून दरपत्रके खालील नमुन्यात मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | तपशील/कामाचे स्वरूप | संभाव्य VIDEO संख्या | प्रती VIDEO दर | | संभाव्य संख्येनुसार दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विना GST नुसार दर | GST सह दर | विना GST नुसार दर | GST सह दर |
| १ | प्रती २ ते ५ मिनिटांचा VIDEO (Video ग्राफी व एडिटिंगच्या सहित खर्च नमूद करण्यात यावा.) | २ | | | | |
| २ | प्रती १० ते २० मिनिटांचा VIDEO (Video ग्राफी व एडिटिंगच्या सहित खर्च नमूद करण्यात यावा.) | २ | | | | |
| ३ | प्रती ३० ते ४० मिनिटांचा VIDEO (Video ग्राफी व एडिटिंगच्या सहित खर्च नमूद करण्यात यावा.) | १३ | | | | |
| | एकूण खर्च | १७ | | | | |

सदर प्रशिक्षणाचे व्हिडिओचे पूर्वनियोजन करण्यात आलेले आहे. सहा घटक व १२८ मानाकावर आधारित प्रति मानक २ अथवा ३ आवश्यकतेनुसार अंदाजे १३ ते १७ व्हिडिओंची

निर्मिती करणे आवश्यक आहे.सदर व्हिडिओ तयार करून ते ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने हे व्हिडिओ तयार करावयाचे आहेत. खालील अ- प्रमाणे तांत्रिक विश्लेषणानुसार (Technical Specification) व ब - मधील अटी व शर्तींच्या आधीन राहून आपण आपल्या संस्थेमार्फत सदर video निर्मितीसाठी दरपत्रक विहित नमुन्यात सादर करावेत.

अ- तांत्रिक विश्लेषण (Technical Specification)

१. सदर प्रशिक्षण आशय हा सहा घटकात विभागला असून यातील आशयावर आधारित ३० ते ४० मिनिटांच्या कालावधीचे व्हिडिओ तयार करणे अपेक्षित आहे.आवश्यकतेनुसार VIDEO ची संख्या कमी जास्त होऊ शकते.

२. व्हिडिओ तयार करून त्याचे पुनरावलोकन केल्यानंतर आवश्यकतेनुसार त्यामध्ये बदल करून देणे सेवा पुरवठादारास बंधनकारक राहील.

३. व्हिडिओ तयार केल्यानंतर ते व्हिडिओ एका पेक्षा अधिक प्लॅटफॉर्मवर/उपकरणांवर अडथळ्याशिवाय किंवा सहज कार्य करतात याची खात्री करणे बंधनकारक राहील.जसे की- लॅपटॉप,टॅब्लेट,डेस्कटॉप, स्मार्टफोन इत्यादी.

४. सदर दरपत्रकात १७ मोड्यूलसाठी अंदाजे ७ ते १० तासांचे व्हिडिओ शूटिंग, व्हिडीओ मिक्सिंग, फायनल एडिटिंग करून व्हिडिओ ताब्यात देणे इत्यादीसह दर नमूद केलेला असावा.

५. व्हिडीओ शुटींगपूर्वी सुलभकांसाठी लागणारे प्रशिक्षण (भाषा,पोशाख,हावभाव इत्यादीबाबत),तसेच प्रत्यक्ष चित्रीकरणाच्यावेळी मार्गदर्शन करणे बंधनकारक राहील.

६. तयार होणारे व्हिडीओ स्पष्ट (दृश्य आणि लेखन मजकुरासह) दिसणारे असावेत.

७. व्हिडीओ मधील दृश्य आणि आवाज, पाहताना आणि ऐकताना पार्श्वभूमीतील ( background ) अनावश्यक दृश्यामुळे आणि आवाजामुळे तयार करण्यात आलेला व्हिडीओच्या मूळ आशयास बाधा येणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

८. व्हिडिओची गुणवत्ता DIKSHA सारख्या राष्ट्रीय प्लॅटफॉर्मवर uploadकरण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणवत्तेशी सुसंगत असली पाहिजे किंवा कार्यालयाद्वारे जे काही ठरवले जाईल त्या सर्व बाबींची पूर्तता करणारे गुणवत्तापूर्ण व्हिडीओ बनविणे बंधनकारक राहील.

९. Video recording format technical parameters खालील प्रमाणे आवश्यक -

१ Video recording format - full HD १९२०x१०८० Pix.

२. Studio/outdoor recording on २५ Mbps or better.

३. Audio recording should be on AAC २ Ch १६ bit, ४८ Khz.

४. Video aspect ratio -१६:९ (widescreen)

५.Video frame to maintain ६-८% Headroom

६. Compressed video - १९२०० following MPEG-AVC/HEVC

७. Audio channel to have Mixed Audio Track

८. C. Font size-Heading: २४-३०, Subheading: २२-२६; Body: २०-२४.

९. All graphs and diagrams must have clear font.

**ब - दरपत्रकातील अटी व शर्ती**

१.दरपत्रक बंद पाकीटात सादर करावे. पाकिटावर " (School Quality Assurance & Accreditation Framework-SQAAF) मूल्यांकन करिता व्हिडिओ शूटिंग दरपत्रक" असे नमूद करावे.

२. दरपत्रकामध्ये व्हिडीओचा दर अक्षरी व अंकी नमूद करावे त्यामध्ये खाडाखोड असू नये.

३. उपरोक्त नमूद केलेले दर हे GST सहित असावेत.

४. काम समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर देयकाची अदायगी करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत अग्रीम (ऍडव्हान्स) दिले जाणार नाही.

५. Tax Invoice च्या मूळ रकमेवर नियमानुसार ITDS व GST शासन नियमानुसार कपात केला जाईल.

६. दरपत्रकासोबत वस्तू व सेवाकर विभागाची नोंदणीकृत नोंदणी असल्याची नोंदणी क्रमांकाबाबतची प्रत जोडावी.

७. संस्थेचे PAN कार्ड दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे.

८. उपरोक्त कामातील अ व ब मधील अटी व शर्ती शिथील करण्याचा तसेच कोणतेही दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे ३० यांनी राखून ठेवलेला आहे.

९. दरपत्रक लेटरहेडवर असणे आवश्यक आहे व त्यावर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

१०. सेवा पुरवताना संस्थेच्या कार्यालयात येऊन सेवा देणे बंधनकारक राहील.

११. सेवेचा दर्जा हा उत्कृष्ट व कामाच्या specificationनुसार असावा, तसे नसल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर आपल्या सेवेबाबत निर्णय घेऊन सेवा घेणे रद्द केले जाईल.

१२. सेवा देताना संस्थेकडून निर्गमित केलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

१३. भविष्यात कामाच्या गुणवत्तेबाबत /लेखा आक्षेपाबाबत आवश्यक कागदपत्राची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१४.संस्थेला सदर कामकाजा बाबत शासकीय अथवा निम शासकीय यंत्रणेतील अनुभव असणे आवश्यक राहील.

१५. कामाच्या पूर्णत्वाचा दाखला सक्षम प्राधिकरण यांनी दिल्यावर सदर कामाचे देयक अदा केले जाईल.

१६. ज्या पात्र संस्थेचा एकूण खर्चाची रक्कम सर्वात कमी असेल त्या संस्थेची निवड करण्यात येईल व त्यानंतर कार्यारंभ आदेश निर्गमित करणेत येतील.

**उपरोक्त अटी व शर्तींच्या पूर्ततेसह आपण दिनांक१५/१२/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत दरपत्रक प्रस्तुत कार्यालयात सादर करावेत.विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेण्यात येणार नाहीत.**

(राहूल रेखावारभा.प्र.से)
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०